**मुंबई विद्यापीठ**
विक/४३४ /२००३
दिनांक : २ सप्टेंबर, २००३

**परिपत्रक :**

प्राचार्य / संचालक, सर्व संलग्नित अशासकीय कला, वाणिज्य व विज्ञान विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी व तत्सम महाविद्यालये / संस्था, तसेच उपकुलसचिव आस्थापना विभाग, शिक्षक नियुक्ती विभाग व उपकुलसचिव संलग्नता विभाग यांच्या माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

कुलसचिवांकरिता

---

**महाराष्ट्र शासन**

कालमर्यादीत

क्रमांक-संकीर्ण-११०३/(११९/०३) विशि-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०००३२
दिनांक - २९ जुलै २०००३.

प्रति,
कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ,
मुंबई.

विषय : शारिरीकदृष्या अपंग व्यक्तींच्या राखीव पदांचा अनुशेष भरुन काढण्याबाबत.

महोदय,

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभागाचे शारिरीकदृष्या अपंग व्यक्तींच्या राखीव पदांचा अनुशेष भरुन काढण्याबाबत विशेष मोहिम सुरू करण्याबाबत या विषयाचे परिपत्रक क्र. अपंग-२००२/प्रक१९५ (भाग १)/-सुधार-3, दि. १ जुलै २००३ सोबत जोडले आहे त्यानुसार दि. ३१ जुलै, २००३ पर्यंत अनुशेषांतर्गत भरण्यात आलेल्या पदांचा अनुपालन अहवाल आयुक्त, अपंग कल्याण व शासनास त्वरित सादर करावा, ही विनंती.

आपला विश्वासू
सही
( फु. स. मेश्राम )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
निवड नस्ती, विशि - २ कार्यासन.

-२-

शारिरिकदृष्या अपंग व्यक्तिंच्या राखीव पदांचा अनुशेष भरुन काढण्याबाबत विशेष मोहिम सुरु करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक क्र : अपंग २००२/प्र.क्र. १९५ (भाग-१)/सुधार-३,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १ जुलै, २००३

वाचा : १)शासन परिपत्रक, सा. प्र. वि. क्र. : बीसीसी २००२२१३०६/१६-ब, दिनांक २/१/२००३.
२)शासन निर्णय, वित्त विभाग क्र. असंक -१००१/प्र.क्र. २९(भाग-३)२००२/वित्तीय सुधारणा, दिनांक ९ जानेवारी, २००३.

शासन परिपत्रक

शारिरीकदृष्या अपंग व्यक्तींच्या राखीव पदांचा अनुशेष भरुन काढण्यास प्रशासकीय व तांत्रिक अडचणी येत असल्याने, वित्त विभागाने वरील संदर्भ क्र. २ येथील दिनांक ९/१/२००३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर शासन निर्णयातील सुधारित उपपरिच्छेद-३.२ मध्ये नमूद केल्यानुसार, <u>**शारिरीकदृष्या अपंग व्यक्तींची आरक्षित पदे कोणत्याही कारणास्तव ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी रिक्त राहिली तरी व्यपगत होणार नाहीत**</u> असे आदेश निर्गमित केले आहेत. त्यास अनुसरुन अपंग व्यक्तींची राखीव पदे भरण्याबाबत विशेष भरती मोहिम सुरु करण्याचा शासनाचा विचार होता. त्यास अनुसरुन शारिरिकदृष्या अपंग व्यक्तींच्या पदांच्या अनुशेषाचा आढावा घेऊन ती पदे भरण्याबाबत कार्यवाही करावी, अशा सर्व विभागांना या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यांत येत आहेत.

२) सदर अपंग व्यक्तींची राखीव पदे भरण्यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यांत येत आहेत त्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे :-

अ) शासकीय / निमशासकीय कार्यालयांनी प्रथमतः पदांचा आढावा घेऊन अपंगासाठी पदे आरक्षित करण्याची कार्यवाही पूर्ण करावी.

ब) शासकीय / निमशासकीय सेवा तसेच मंडळे, महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हापरिषदा, शासकीय अनुदानप्राप्त संस्था, सहकारी संस्था, विद्यापीठे व शासकीय उपक्रम इत्यादी कार्यालयातील सर्व संवर्गाची पदनिर्मिती, पदभरती व पदांचे पुनरुज्जीवन याबाबतच्या निर्बंधासंदर्भात वित्त विभागाने दि. १० सप्टेंबर, २००१ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यानुसार नियुक्ती प्राधिका-याने त्यांच्या आस्थापनेवरील पदांचा आढावा घेणे आवश्यक आहे.

(क)शासकीय, निमशासकीय इत्यादी कार्यालयातील सरळसेवा भरती व पदोन्नतीमधील (अपंगांचा) अनुशेष भरुन काढण्याबाबत यापूर्वीच वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यांत आलेले आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभागाने दि. १० मार्च, १९९९ च्या शासन परिपत्रकात अनुशेषाची केलेली व्याख्या व अपंग व्यक्ती अधिनियम, १९९५ मधील कलम ३६ नुसार विशिष्ट प्रवर्गाची अपंग व्यक्ती उपलब्ध न झाल्यास ती रिक्त पदे पुढील भरती वर्षापर्यंत पुढे ओढावे व त्या वर्षातही त्या प्रवर्गाची व्यक्ती उपलब्ध न झाल्यास ते पद अपंगाच्या इतर प्रवर्गात आंतर बदल करुन भरावे. असे करुनही उमेदवार उपलब्ध न झाल्यास ते इतर उमेदवारातून भरावे अशी तरतूद आहे, हे विचारात घेता अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेला आरक्षणाचा अनुशेष, आरक्षण ठेवल्यापासून फक्त एक वर्षापर्यंत राहिल सदरील अनुशेष सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ८/१०/१९९७ च्या शासन निर्णयानुसार त्या-त्या संवर्गामध्ये (अपंगांच्या) वेगवेगळ्या गटासाठी आरक्षणाच्या विहित टक्केवारीच्या मर्यादेत विशेष भरती मोहिमेंतर्गत पूर्णपणे भरुन काढता येईल. चालू रिक्त पदे (Current Vacancies) नेहमीच्या पध्दतीनुसार बिंदू नामावलीनुसार भरणयांत यावीत, असेही दि. १० मार्च, १९९९ च्या शासन परिपत्रकांत स्पष्ट केले आहे.

-३-

(ड) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यांत येणा-या गट-क च्या पदाबाबत प्रत्येक विभागाने पदांचा आढावा घेऊन मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यांत यावे. तसेच राज्यस्तरीय संवर्गातील सर्व पदे विहित मार्गाने भरण्यांत यावी.

३. सदर शारीरीकदृष्या अपंग व्यक्तींचा अनुशेष दिनांक <u>३१ जुलै, २००३</u> पर्यंत भरण्यांत यावा. सदरील पदे विहित मुदतीत भरण्यांत आली नाहीत तर संबंधित नियुक्ती प्राधिका-याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने करावी.

४. दि. ३१ जुलै, २००३ पर्यंत अनुशेषांतर्गत भरण्यात आलेल्या पदांचा एकत्रित अनुपालन अहवाल मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने सोबत जोडलेल्या विविरणपत्रात दिनांक १५/८/२००३ पर्यंत शासनास सादर करावा व त्याची एक प्रत आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे पाठविण्यांत यावी.

५. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय / निमशासकीय इत्यादी कार्यालयांना या परिपत्रकानुसार योग्य त्या सूचना विनाविलंब निर्गमित करण्यांत याव्यात व त्याची एक प्रत या विभागाकडे पाठवावी. याबाबत काही अडचणी असल्यास सामान्य प्रशासन विभागाचा त्वरीत सल्ला घेण्यांत यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही /-
( वै. अ. पारकर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव / अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
संचालक, समाजकल्याण, पुणे
संचालक, आदिवासी विकास, नाशिक
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवा योजन, मुंबई,
आयुक्त अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्वविभागीय आयुक्तांचे कार्यालये,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कायसिने,
निवडनस्ती
पत्राने